**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED JOURNAL, JULY-AUG, 2018, VOL- 6/46*

**औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील पालक-पाल्याच्या आंतरक्रियाचा अभ्यास**

**एस.एस.पाठक, Ph. D. & तायडे दंडपाल भिमराव**

*[१]सहाय्यक प्राध्यापक, पदव्युत्तर शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

*ईमेल- sspathak2010@gmail.com*

*[२]संशोधक, संशोधक विद्यार्थी., ईमेल- dandpaltayde03@gmail.com*

**Abstract**

*आजकालच्या मुलाना आई-वडील असतात पण पालक नसतात. पालकांचे प्रबोधन पालकत्वाची जाणीव करून देऊन सुयोग्य मार्गदर्शन करण आजच्या युगात अत्यावश्यक आहे. बेजबाबदार बेपर्वा पालकामुळे मुल घडवण्याऐवजी बिघडतात ही अशी अनेक मंत पालकासंबंधी प्रक्रिया होते पालक शिक्षक हितचिंतक शिक्षणतज्ज्ञ मार्गदर्शक इत्यादीकडून ऐकायला मिळतात पालक होणे सोपे पण पालकत्वाची जबाबदारी निभावण अवघड गुंतागुंतीचं महाकर्मकठीण होत. चाललय सुजाण पालकत्व म्हणजे काय पालकत्वाची प्रमुख जबाबदारी कोणती या संबंधी आपण माहीती पाहु.*

*पालक पाल्य नातें संदोष बनल की दुरावा वाढत राहतो मग मुल पालकांना टाळतात अडवाउडवपीची लपवालपवी करतात मुलांचे प्रश्न निर्माण होतात. गुंतागुंत वाढत जाते. अन् मग परिस्थिती हाताबाहेर जाते. मुलांना शिक्षण देण त्यांना वह्या पुस्तक, लेखन साहित्य देण त्यांना शाळेत घालून फ्री भरण क्लासला धाउण कपडालत्ता देण खाऊ-पिऊ घालण त्याच्या गरजा पूर्ण करण म्हणजे पालक म्हणुन कर्तव्य केल अस माननं अयोग्य आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रास्ताविक:**

एकविसावे शतक हे जागतिकिकरणाचे शतक म्हणुन ओळखले जात आहे. ज्ञान विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रचंड प्रगतीमुळे ज्ञानाच्या प्रस्फोटाचे हादरे बसत आहेत. ज्ञान क्षेत्रातल्या बदलामुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात बदल होत आहेत. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत शिक्षण आणि विकास व आतंरक्रिया या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. व्यक्तीगत, सामाजिक किंवा अन्य कोणत्याही क्षेत्राच्या विकासासाठी शिक्षण अतिशय महत्त्वाचे आहे. म्हणुनच आज आपण अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्य याबरोबरच शिक्षण ही देखील मानवाची मुलभुत गरज आहे. हे मान्य केले आहे. एकविसाव्या शतकात शिक्षणाचे बीज तळागळापर्यंत पोहचत आहे. शिक्षणाच्या उपयुक्ततेबरोबरच थोडासा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोण ही या शतकातील मानवाचा बदलत आहे ६ ते १४ वर्षे वयोगट असलेल्या प्रत्येक बालकाला शिक्षणाचा मुलभुत हक्क संविधानाने मान्य केलेला आहे. शासनाने ६ ते १४ या वयोगटातील बालकाला मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा निर्धार केलेला आहे. दोन किंवा चार वर्षाचे मुल होत नाही तोच शाहेत (तेही इंग्रजी माध्य Semi English mediam) टाकण्यास उत्सुक असतात. आई दोन तास का होईना स्वतःच्या जबाबदारीतुन मुक्त होण्याचा प्रयत्न करते. तर बाबा आपला स्व जपण्यासाठी या चिमुकल्या बालकांला शाळेत टाकतात गोष्ट इथपर्यंत ठिक आहे. मात्र शिक्षु-वर्गातील बालकांपासुन ते उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्याला घरी आल्याआल्याच आज काय शिकवले? होमवर्क काय दिला? चल अभ्यास कर खेळण कमी कर नसुता T.V. टि.व्ही. पाहतो. दिवसभर शाळेतील शिक्षकांचा धाक आणि घरी आले की पालकांचा धाक या दोन्हीच्या मध्ये विद्यार्थ्यांची अवस्था केविलवाणी होते. कारण शाळेतील अभ्यास विद्यार्थ्याला कटाळवाणा

वाटतो. आणि विद्यार्थी अभ्यासापासुन दुरावतो. या ठिकाणी सर्व पालकांची जबाबदारी पणास लागण्याची वेळ असते कारण पाल्याला आलेला कटाळवाणा घालवून तो कसा उत्साहाणे किंवा प्रेरणेणे अभ्यास करणार या कडे सर्व पालकांचे लक्ष केंद्रित व्हायला पाहिजेत कारण त्याला अभ्यासापासून दूर नाही करायच तर त्याला अभ्यासाची सवय आणि अभ्यासाची सागळ कशी घालायची हे शिकवले पाहिजे. हे शिकवायचे असेल तर पालक आणि पाल्य यामध्ये योग्य आंतरक्रिया घेणे आवश्यक आहे त्या आंतरक्रियेमुळे तो अभ्यासापासुन दुर न जाता तो अभ्यासासोबत चांगली प्रकृती राहील याची काळजी घेणे आवश्यक आहे.

खरे पाहता मुलांच्या जीवनातील शैक्षणिक काळे हा अतिशय महत्त्वाचा असतो नवी जडणघडण मुलाच्या शिक्षणाबरोबरच होणे आवश्यक आहे. जडणघडणीसाठी शिक्षणबरोबरच अन्य कौशल्य आणि सामाजिक जबाबदारी हे सुद्धा गरजेचे असते त्यामळे मुलांच्या सर्वांगीण विकास होऊ शकतो. मुलांची प्रगती होऊ शकते. नव्या पिढीतील या मुलांवर नव्या जगाचे वेगळे आव्हान आणि जबाबदारी आहे ते पेलण्यासाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये योग्य आंतरक्रिया होणे आवश्यक आहेत नव्या पिढीतील नवीन आव्हाने पेलण्यासाठी सुद्धा आंतरक्रिया महत्त्वाच्या ठरतात शैक्षणिक काळातील ही जबाबदारी पार पाडण्यास शिक्षण संस्थाचा व त्याच बरोबर शाळाचा वाटा मोलाचा असून हे नवे आव्हान पूर्ण करण्याच्या दृष्टीने मुलांची सर्वांगीण वाढ करण्याची जबाबदारी ख-या अर्थान पालक आणि शिक्षक यांची आहे.

सहसालेय उपक्रम हाती घेतलेले असता अशा शिक्षण संस्थामधून निरिक्षण करून येणा-या संभाव्य अडचणीणा तोंड देण्याकरिता पालक, शिक्षक आणि विद्यार्थी तसेच ग्रामीण भागातील शाळेचा विचार करून अभ्यासपूरक आणि सपांदणुक वाढीसाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थी आंतरक्रियाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**संशोधनाची गरज :**

१. पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये पालकांचे योगदान महत्त्वाचे असल्याने त्याच्या संदर्भातील आंतरक्रियेचा अभ्यास करणे गरजेच वाटते.

**संशोधनाचे महत्त्व :**

१. मुलांच्या जीवनातले अनेक शैक्षणिक प्रश्न सुटण्यासाठी ह्या आंतरक्रिया महत्त्वाच्या आहेत.

२. २१ व्या शतकांत माहिती तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी/पाल्य कुठेही कमी पडू नये तसेच त्याचा समतोल विकास व्हावा या दृष्टीने सदरील संशोधन महत्त्वाचे आहे.

**गृहीतके :**

१. पालक मेळाव्याचे शाळेतुन निमंत्रण देऊन सुद्धा पालक शाळेत जात नाहीत.

२. समाजात शाळेसंबंधी दृढ झालेला दृष्टीकोन हा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रेरणेचा आणि प्रगतीचा अडथळा बनला आहे.

बहुतांश पालकांना ख-या शिक्षण्याविषयक जनजागृतीची आवश्यकता आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील पालक आणि पाल्य यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रियाचा अभ्यास करणे.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

औरंगाबाद जिल्ह्यातील उच्चय प्राथमिक शाळेतील पालक आणि पाल्य यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रियामधील येणा-या अडचणीचा शोध घेणे.

औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक- शाळेतील पालक आणि पाल्य यांच्यातील प्रतिकुल आंतरक्रियामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनातील येणा-या समस्यावर उपाययोजना सुचविणे.

**परिकल्पना :**

औरंगाबाद जिल्ह्यातील उच्च प्राथमिक शाळेतील पालक आणि पाल्य यांच्यात नियमित शैक्षणिक आंतरक्रिया होत असाव्यात.

**संशोधनाची पद्धत**

सदर संशोधन हे वर्तमानकालीन पालक आणि पाल्य यांच्या वर्तमान माहितीवर आधारीत असल्यामुळे संशोधकाने सर्वेक्षण पद्धतीची निवड केली आहे.


**संशोधनाची साधनेः-**

प्रस्तुत संशोधनासाठी माहीती संकलनासाठी साधन म्हणून प्रश्नावली हे साधन म्हणून वापरले आहे.

**कोष्टक क्र. १. पाल्याच्या मित्र मैत्रिणीबद्दल पालकांना संपूर्ण माहिती असल्या बाबतचा माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | राहण्याचे ठिकाण | २८८ | २८.८ |
| २. | कौटुंबीक माहिती | २०८ | २०.८ |
| ३. | शैक्षणिक प्रगती | १०० | १० |
| ४. | भाषिक विकास | १०७ | १० |
| ५. | सामाजिक स्थिती | १४७ | १४.७ |
| ६. | आई-वडिलांचा भ्रमणध्वनी क्रमांक | १५० | १५ |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. १ पाल्याच्या मित्र मैत्रिणीबद्दल तुम्हाला संपूर्ण माहिती असल्या बाबतचा माहिती दर्शविणारा आलेख**




*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*


**विश्लेषण :-**

वरील कोष्टक क्र. १. मधील माहितीनुसार २८.८% पालकांनी राहण्याचे ठिकाण या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०.८% पालकांनी कौटुंबीक माहिती या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% पालकांनी शैक्षणिक प्रगती या पर्यायास प्रतिसाद दिला तर १४.७% पालकांनी सामाजिक स्थिती या पर्यायास प्रतिसाद दिला तर १५% पालकांनी आई-वडिलांचा भ्रमणध्वनी क्रमांक व व्हॉट्सॲप या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. २. पाल्य कोणाची मदत घेतो या बाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | आई वडील | ४०० | ४० |
| २. | मोठा भाऊ, बहीण | १०० | १० |
| ३. | आजी आजोबा | १०० | १० |
| ४. | काका, काही / मामा-मामी | १०० | १० |
| ५. | शिक्षकांची | ३०० | ३० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. २. पाल्य कोणाची मदत घेतो या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण :-**


वरील कोष्टक क्र. २. मधील माहितीनुसार ४०% पालकांनी आई-वडील दोघांची या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% पालकांनी मोठा भाऊ बहीण या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% पालकांनी आजी आजोबा या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% पालकांनी काका-काकी / मामा-मामी या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३०% पालकांनी शिक्षकांची मदत घेतात या पर्यायास प्रतिसाद दिला.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**कोष्टक क्र. ३. तुमच्या पाल्यांना कोणता विषय कठीण वाटतो या बाबतचा पालकांच्याप्रतिसादाचा तक्ता.**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | गणित / भूमिती | ३०० | ३० |
| २. | इंग्रजी | ४०० | ४० |
| ३. | मराठी, हिंदी | १५० | १५ |
| ४. | विज्ञान | १५० | १५ |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ३. तुमच्या मुलांना / मुलींना कोणता विषय कठीण वाटण्याबाबतचा पालकांच्या प्रतिसादाचा आलेख**




**विश्लेषण :-**


वरील कोष्टक क्र. ३ मधील माहितीनुसार ३०% पालकांनी गणित / भूमिती या पर्यायास प्रतिसाद दिला. तर ४०% पालकांनी इंग्रजी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १५% पालकांनी मराठी /हिंदी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १५% पालकांनी विज्ञान या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ४. पाल्यावर चांगले संस्कार व्हावे असे वाटत असेल तर पालकांनी स्वतः संस्कारक्षण असावे या बाबत प्रतिसाद दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्वतः संस्कारक्षम असावे | ३०० | ३० |
| २. | संस्कार केंद्र | २०० | २० |
| ३. | अध्यात्माकडे वळणे | २०० | २० |
| ४. | चांगल्या गोष्टी शिकवणे | १०० | १० |
| ५. | योगा करण्यास सांगावे | २०० | २० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**आलेख क्र. ४. मुलांवर चांगले संस्कार व्हावे असे वाटत असेल तर पालकांनी स्वतः संस्कारक्षण असावे या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**





**विश्लेषण :-**

वरील कोष्टक क्र. ४ मधील माहितीनुसार ३०% पालकांनी स्वतः संस्कारक्षम असावे या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% पालकांनी संस्कार केंद्र या पर्यायास प्रतिसाद दिला. तर २०% स्वतः संस्कारक्षम असावेत २०% पालकांनी अध्यात्माकडे वळावे या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% पालकांनी चांगल्या गोष्टी शिकवणे या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% पालकांनी योगा करण्यास सांगावे या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ५ पालक-पाल्यासोबत शाळेव्यतिरिक्त विविध ठिकाणी शैक्षणिक भेटी देतात या बाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ग्रंथालय | २०० | २० |
| २. | संग्रहालय | ३०० | ३० |
| ३. | प्राणी संग्रहालय | २०० | २० |
| ४. | किल्ले | २५० | २५ |
| ५. | प्रसिद्ध ठिकाणी | ५० | ५ |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ५ पाल्याला शाळेव्यतिरिक्त परिसरातील विविध ठिकाणी शैक्षणिक भेटी देतात या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण :-**


कोष्टक क्रमांक ५ मधील माहितीनुसार २०% पालक-पाल्याला शाळेव्यतिरिक्त परिसरातील ग्रंथालयाला भेटी देतात. तर ३०% पालक पाल्याला शाळेच्या व्यतिरिक्त परिसरातील ऐतिहासिक संग्रहालय भेटी देतात. तर २०% पालक-पाल्याला शाळेव्यतिरिक्त परिसरातील प्राणी संग्रहालय भेटी देतात. २५% पाल्याला शाळेव्यतिरिक्त परिसरातील किल्ल्यांना भेटी देतात तर ५% पाल्यांना शाळेव्यतिरिक्त परिसरातील प्रसिद्ध ठिकाणी भेटी देतात.

**कोष्टक क्र. ६ पालक-शिक्षक चर्चा करताना विद्यार्थ्यांच्या मत व सहभागाबाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वाचणाची गतीविषयी | १०० | १० |
| २. | लिखाणाची गतीविषयी | १०० | १० |
| ३. | मनमोकळेपणाने बोलण्याविषयी | १०० | १० |
| ४. | गैरहजेरी विषयी | ३०० | ३० |
| ५. | आरोग्यविषयी | २०० | २० |
| ६. | नीटनेटकेपणाविषयी | १०० | १० |
| ७. | आत्मविश्वास विषयी | १०० | १० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**आलेख क्र. ६ पालक शिक्षक चर्चा करताना तुम्हाला सहभाग करून विद्यार्थ्यांचे मत दोघेही जाणून घेतात या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण :-**


कोष्टक क्रमांक ६ मधील माहितीनुसार १०% विद्यार्थ्यांनी वाचण्याच्या गतिविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थ्यांनी लिखाणाची गतिविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थ्यांनी मनमोकळेपणाने बोलण्याविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३०% विद्यार्थ्यांना गैरहजेरीविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% विद्यार्थी आरोग्यविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १% विद्यार्थी नीटनेटकेपणाविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थी आत्मविश्वासाविषयी या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ७ मुलांच्या अभ्यासाचे नियोजन कशा पद्धतीने करतात या बाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | वेळापत्रक करून | ३३० | ३३ |
| २. | शाळेच्या वेळापत्रकानुसार | २३२ | २३.२ |
| ३. | कधी-कधी | १८३ | १८.३ |
| ४. | परीक्षा जवळ आल्यावर | २५५ | २५.५ |
| ५. | यापेक्षा वेगळे | ०० | ०० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**आलेख क्र.७ मुलांच्या अभ्यासाचे नियोजन कशा पद्धतीने करतात या बाबत माहिती दर्शविणारा आलेख**





**विश्लेषण :-**

कोष्टक क्रमांक ७ मधील माहितीनुसार ३३% विद्यार्थी वेळापत्रक करून या पर्यायास प्रतिसाद दिला तर २३.२% विद्यार्थ्यांना दररोज या पर्यायास प्रतिसाद दिला तर १८.३% विद्यार्थ्यांना कधी-कधी या पर्यायास प्रतिसाद दिला तर २५.५% विद्यार्थ्यांची परीक्षा जवळ आल्यावर या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ८ विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शुद्ध लेखन | २०० | २० |
| २. | स्पष्ट वाचन | १०० | १० |
| ३. | भाषण | १०० | १० |
| ४. | वाद-विवाद स्पर्धा | २०० | २० |
| ५. | पाठांतर स्पर्धा | ३०० | ३० |
| ६. | टाकाऊ वस्तूपासून टिकावू वस्तू बनवणे | १०० | १० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ८ विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबत माहिती दर्शविणारा आलेख**




Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies


**विश्लेषण :-**

कोष्टक क्रमांक ८ मधील माहितीनुसार २०% विद्यार्थी शुद्ध लेखन या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १०% विद्यार्थी स्पष्ट वाचन या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% विद्यार्थी वाद-विवाद स्पर्धा या पर्यायास प्रतिसाद दिला तर ३०% विद्यार्थी पाठांतर स्पर्धा या पर्यायास प्रतिसाद देतात तर १०% विद्यार्थी टाकाऊ वस्तूंपासून टिकावू वस्तू बनवणे या पर्यायास प्रतिसाद दिला.

**कोष्टक क्र. ९ पालक पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीविषयी समाधानी असल्यास वर्षातून किती वेळा शिक्षकांशी चर्चा करतात याबाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | पर्याय | प्रतिसाद | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | आठवड्यातून एकदा | ३०० | ३० |
| २. | पंधरा दिवसातून एकदा | २०० | २० |
| ३. | महिन्यातून एकदा | २०० | २० |
| ४. | ३ महिन्यांतून एकदा | १०० | १० |
| ५. | ६ महिन्यांतून एकदा | १०० | १० |
| ६. | वर्षातून एकदा | १०० | १० |
| | **एकूण** | **१०००** | **१००** |

**आलेख क्र. ९: पालक पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीविषयी समाधानी असल्यास वर्षातून किती वेळा शिक्षकांशी चर्चा करतात याबाबत माहिती दर्शविणारा आलेख**




**विश्लेषण :-**

कोष्टक क्रमांक ४.३.२८ मधील माहितीनुसार ३०% विद्यार्थ्यांचे पालक आठवड्यातून एकदा भेटतात या पर्यायास प्रतिसाद दिला. तर २०% विद्यार्थ्यांचे पालक पंधरा दिवसातून एकदा भेटतात. या पर्यायास प्रतिसाद दिला तर २०% विद्यार्थ्यांचे पालक महिन्यातून एकदा भेटतात या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थ्यांचे पालक ३ महिन्यातून एकदा भेटतात या पर्यायास प्रतिसाद दिला. तर १०% विद्यार्थ्यांचे पालक ६ महिन्यातून एकदा भेटतात या पर्यायास प्रतिसाद दिला तर १०% विद्यार्थ्यांचे पालक वर्षातून एकदा भेटतात या पर्यायास प्रतिसाद दिला.

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**निष्कर्ष :-**

१. २८.८% पालकांना पाल्याच्या मित्र-मैत्रिणीबद्दल राहण्याचे ठिकाण व याबद्दल माहित आहे.

२. ४०% पाल्य प्रोजेक्ट तयार करताना आई-वडील दोघांचीही मदत घेतो.

३. ४०% पालकांनी मुलांना इंग्रजी विषय कठीण वाटतो असे सांगितले आहे.

४. सर्वाधिक ३०% पालकांच्या मते अगोदर स्वतः संस्कारक्षम असावे.

५. ग्रंथालय, संग्रहालय, प्राणी संग्रहालय (उद्यान) किल्ले, प्रसिद्ध ठिकाण, पालक पाल्यासोबत शैक्षणिक भेटी देतात.

६. वाचनाची गतीविषयी, लिखानाची गतीविषयी मनमोकळेपणाने बोलण्याविषयी, गैरहजेरीविषयी, आरोग्यविषयी, नीटनेटकेपणाविषयी, आत्मविश्वासविषयी पालक शिक्षक चर्चा करताना विद्यार्थ्यांच्या सहभाग घेतात.

७. ३३% विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे नियोजन वेळापत्रकानुसार करतात.

८. शुद्ध लेखन, स्पष्ट वाचन, भाषण, वाद-विवाद स्पर्धा, पाठांतर स्पर्धा, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनविणे, वरील सर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक वाढविण्यासाठी स्पर्धा घेतात.

९. सर्वाधिक ३०% विद्यार्थ्यांचे पालक आठवड्यातून एकदा भेटतात.

**संदर्भ ग्रंथसूची**

*घोरमोडे के. यु. आणि घोरमोडे कला (२००६) : शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, प्रथम आवृत्ती, नागपूर : विद्या प्रकाशन.*

*पंडित प. ब. (२००८) : शिक्षणातील संशोधन, पुणे : नूतन प्रकाशन.*

*भांडारकर के. एम. (२०१०) : सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, तिसरी आवृत्ती, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.*

*सोनाली दातार (२०१३), ''संगोपन पालकत्वाचे(, प्रथमावृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन.*

*श्रुती पानसे (२००७), ''अशी का वागतात मुल'', पहिली आवृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन.*

*रोहिणी चितळे (१९९२), ''मुलाशी सुसंवाद'', प्रथमावृत्ती, पुणे, उन्मेष प्रकाशन.*

*डॉ. अनुराधा सोवनी आणि माधुरी भिडे (२००७), ''आपली मुले का बिघडतात'', प्रथमावृत्ती, पुणे : उन्मेष प्रकाशन.*

*आशा परुळेकर (२०१२), ''मुलांना आपण हे शिकवलेच पाहिजे!'' दुसरी आवृत्ती, पुणे : उन्मेष प्रकाशन.*

*कुंडले म. बा. (२०१२), ''शैक्षणिकक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्री. विद्या प्रकाशन, पुणे.*

*भिंतोडे वि. रा. (२००७), ''शैक्षणिक संशोधन पद्धती, नुतन प्रकाशन, पुणे.*

*मुळे रां. शं. व उमाठे वि. तु. (१९९८), ''शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे आवृत्ती ३ नुतन प्रकाशन, पुणे.*

*www.shodhganga.com*

*www.maha.gov.in*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*